**सम्राट अशोक**

बिंदुसारानंतर सम्राट अशोक मगध साम्राज्याचा प्रमुख झाला. अशोकाच्या कारकीर्दीची सर्वांगिण माहिती मिळविण्यास अनेक शिलालेख उपलब्ध आहेत. या शिलालेखांच्या आधारावर अशोकाच्या धर्मासंबंधी निरनिराळी मते विव्दानांनी दिली आहेत. काही विव्दानांच्या मते अशोक बौध्द धर्माचा उपासक असून या धर्माच्या प्रचारासाठी त्याने निरनिराळे शिलालेख लिहिले तर काही विव्दानानी शिलालेखात आढळणा-या अशोकाच्या भाव व विचारावरुन तो जैन धर्माचाच उपासक असावा असे मत दिले आहे. काही विचारवंत असेही आहेत की, ज्यांच्या मते अशोक बौध्दही नव्हता व जैनही नव्हता, तर सन्मार्गाने प्रजेचे पालन करणारा नीतीमान राजा होता. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचा उत्कर्ष करण्यासाठी त्याने एक नवा समन्वयात्मक, असांप्रदयिक व व्यावहारिक धर्मविचार लोकांच्या समो मांडला. बौध्द धर्मग्रंथात अशोकाला चंडाशोक म्हटले असून त्यानी आपल्या ९९ बंधूंचा खून करून सत्ता मिळविली असे म्हटले आहे. तथापि विविध शिलालेखात त्याचे बंधू जीवंत असल्याची व राज्यकारभारात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भाग घेत असल्याची माहिती मिळते. यावरुन बौध्द ग्रंथात दिलेली माहिती योग्य वाटत नाही.

अशोकाच्या कारकिर्दीतील पहिली घटना म्हणजे कलिंगचे युध्द होय. या युध्दात झालेल्या मनुष्यहानीचा परिणाम होऊनच अशोकानी युध्दत्यागाचा निर्णय घेतला. काही इतिहासकारांच्या मते या सुमारास कलिंगच्या प्रदेशात जैनधर्म अस्तित्वात होता. या धर्मातील तत्वाचाच परिणाम होऊन त्याने वरील निर्णय घेतला असावा. युध्द त्यागाचा निर्णय घेतल्यानंतर अशोकाने जैन, बौध्द व हिंदू पंडीतांच्या भेटी घेतल्या, निरनिराळया तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. श्रावकांबरोबर चर्चा केली. निरनिराळया धर्माच्या निरनिराळया संस्थांचे निरीक्षण केले. व आवश्यक तेथे, आवश्यक त्या प्रमाणात सहाकार्य दिले. जीवदया व व्यावहारिक अहिंसेला त्यांनी मूलमंत्र बनविले व या तत्वांचा प्रसार करण्यासाठी तीर्थक्षेत्र किंवा इतरत्र निरनिराळया धर्मीयांना मदत करण्यासाठी नेमणूक केली. त्याच्या एका शिलालेखात मंक्खलिंगो्शालाच्या संप्रदायाच्या आजीवक साधूसाठी त्यांनी बराबर नांवाच्या टेकडीवर गुंफा बांधल्याची माहिती मिळते. चंद्रगुप्तांनी बांधलेला सुदर्शन तलावही याने दुरुस्त केला.पशुवधाचे निवारण करण्याविषयी व मांसाहार बंद करण्याविषयी त्याने कडक स्वरुपाचे नियम केले. वर्षातील ज्या ५६ दिवशी जीवहिंसा करु नये अशी त्याने आज्ञा केली. आहे ते ५६ दिवस जैन परंपरेतील पर्वदिनाशी जुळणारे दिसतात. शिलालेखात निर्ग्रंथ (नग्न जैन मुनी ) साधूंचा विशेष आदर करण्यास सांगितले आहे. या साधूंचा उल्लेख कमी प्रमाणात होता. मगधातील यावेळेचा जैन मंदीर बांधल्याचीही माहिती मिळते. अशोक जैन सिध्दांताच्या दयामूलक उपदेशानी प्रभावित झालेला होता याविषयी विव्दानात दुमत नाही. जैन परंपरेनुसार आपल्या आयुष्याच्या शेवटी अशोक व्रतीश्रावकाप्रमाणे व्रताचार करीत होता व मोठ्या प्रमाणावर दानधर्म करीत असल्याची माहिती मिळते. त्याला याबाबतीत मंत्रीपरिषदेनी विरोध केल्याचीही माहिती सांगितली जाते.

सम्राट अशोक हा जगातील सर्व महान राजापैकी एक होता. त्याचे साम्राज्य अति विस्तृत, समृध्द असून त्याचा शासनकाल हा सुख व शांति इत्यादींनी परिपूर्ण होता. त्याचे व्यक्तित्व महान असून तो पराक्रमी राजा होता. सर्व धर्माना तो समानतेची वागणूक देत असे. तो नितांत असांप्रदायिक, धर्मीभावपूर्ण, प्रजावत्सल, लोकोपकारक व नीतीमान राजा होता. सिरीया, ब्रम्हदेश, सिलोन इत्यादी विविध देशावरही त्याच्या कर्तृत्वाचा प्रभाव पडलेला दिसतो. समाजाची नैतिक पातळी उंचावण्यासाठी सदाचरणावर भर देणा-या नीतितत्वांचा त्याने पाठपुरावा केला. त्याचप्रमाणे उत्कृष्ठ शासनकर्ता म्हणून प्रजेचे संरक्षण, संवर्धन, लाकोपयोगी कार्ये त्याने केल्याची माहिती मिळते, म्हणूनच सांस्कृतिक जीवनाबरोबरच राजकीय जीवनातही त्याचे स्थान अनन्यसाधारण आहे.

**सम्राट संप्रति**

सम्राट अशोकाच्या कारकीर्दीनंतर मगधच्या सत्तेवर आलेला राजा 'संप्रति' हा जैन इतिहासाच्या दृष्टिने महत्वाचा राजा होय. सम्राट संप्रतीने ४२ वर्षे राज्य केले. पितामह अशोकाप्रमाणे तो महान, प्रजावत्सल शांतीप्रिय व प्रतापी सम्राट होता. आपल्या गुरुच्या आदेशाप्रमाणे एक आदर्श जैन राजाप्रमाणे त्याने आपले जीवन व्यतीत केले. संप्रतीने जैन धर्माच्या प्रचारासाठी निरनिराळे प्रयत्न केले. अनेक तीर्थांचा जिर्णोध्दार, अगणित जिनमंदीराची निर्मिती, निरनिराळ्या ठिकाणी जिनमूर्तीची स्थापना. विदेशात जैन धर्माच्या प्रचारासाठी प्रचारक पाठविणे , इत्यादी अनेक कार्याचे श्रेय या सम्राटालाच देण्यात येते. संप्रतीने भारतात सर्वत्र प्रसारित झालेल्या जैन धर्माला विश्वधर्म बनविण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. त्यानी अनेक विहार बांधले. उज्जयिनी येथे आचार्य सहस्ति यांचा उपदेश याने ग्रहण केला होता. राजस्थानमधील अनेक जैन मूर्ती संप्रतीच्या कारकीर्दीतच तयार करण्यात आल्या असे मानतात. जिनधर्माला आश्रय देऊन आवश्यक ते सर्व सहकार्य करुन त्याच्या स्थानिय स्थितीपासून त्या धर्माला विश्वधर्माचे स्थान मिळवून देण्याचे कार्य संप्रती याने केले. संप्रतीच्या नंतर त्याचा पुत्र शालिशक सत्तेवर आला. आपल्या पित्याप्रमाणेच याने धार्मिक धोरण स्विकारले असून, दूरदूरच्या प्रदेशात जैन धर्माच्या प्रचाराचे महान कार्य याने केले. यानंतरच्या काळात कोणताही नांव घेण्याजोगा राजा मौर्य घराण्यात निर्माण झाला नाही. शेवटच्या 'वृहद्रथ' खून त्याचा सेनापती पुष्यमित्र शुंग यानी केला व मगधावर मौर्य घराण्याचा शेवट करुन शुंग घराण्याची सत्ता इ.स.पू. १८५ च्या सुमारास स्थापन केली.

मौर्य काळातील काही सत्ताधिशांनी जैन धर्माचा व जैनधर्म तत्वांचा स्वीकार केला तर काही सत्ताधिशांनी परधर्म सहिष्णुतेचे धोरण स्वीकारले. त्यामुळे या काळातही जैनधर्माचा प्रसार दूरदूरच्या प्रदेशात झालेला आढळतो. याविषयी आणखी माहिती देणारी इतिहाससाधने उपलब्ध झाली आहेत. राजस्थानमधील माध्यमिका या प्राचीन शहरात वीर प्रभूंच्या निर्वाणानंतर ८४ व्या वर्षी कोरलेला एक शिलालेख मिळाला आहे. त्यावरुन ह्या प्रदेशात त्या काळात जैन समाज अस्तित्वात होता असे निश्चितपणे सांगता येते. ब्राह्मी लिपीतील उपलब्ध शिलालेखामध्ये हा सर्वात प्राचीन शिलालेख मानला जातो. भारतातील मौर्य सम्राटांच्या कारकीर्दीच्या वेळी सिलोनमध्ये जे राजे होऊन गेले त्यांच्यातील पंडुकाभय याने निर्ग्रंथाचे विहार नष्ट करुन त्या जागी बौध्द विहार बांधल्याची माहिती पाली ग्रंथात आढळते. यावरुन एकेकाळी सिलोनमध्येही जैन साधूंचा विहार निश्चितपणे होता असे दिसते. या काळात मौर्य राजानी स्वीकारलेल्या सर्वधर्मसमानतेच्या धोरणामुळे या काळात जैनधर्माचा कलेचा व तत्वज्ञानाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झालेला दिसतो.

चंद्रगुप्ताच्या कारकिर्दीच्या शेवटी उत्तर हिंदुस्थानात मोठ्या प्रकारचा दुष्काळ पडला. यावेळी भद्रबाहु आपला मुनिसंघ व चंद्रगुप्तासह दक्षिण भारतात आले. त्यामुळे आगम ग्रंथाचे पारंपारिक ज्ञान असणा-या साधूंची संख्या दिवसेंदिवस कमी होत गेली. यामुळे या आगमांचा लोप होऊ नये, त्याचे योग्य अभिवर्धन व्हावे या भावनेने आचार्य स्थूळभद्रानी पाटलीपुत्र येथे निरनिराळ्या विव्दान जैन साधूंची परिषद भरविली. अंतिम श्रृतकेवली भद्रबाहूंनाही यावेळी निमंत्रित करण्यात आले, तथापि ते आले नाहीत. पाटलीपुत्र येथील वाचनेत आगमग्रंथाचे पाठ निश्चित करण्यात आले, तथापि ते सधर्मस्वामीनी संकलित केलेल्या मूळ ग्रंथाहून पुष्कळच विभिन्न होते. त्यातील कित्येक भाग त्याकाळच्या विव्दान आचार्यांना योग्य वाटला नाही. प्रामुख्याने साधूंनी वस्त्र व पात्राचा सर्रास उपयोग करावा अयाी जी दुष्काळाच्या वेळी पध्दत रुढ झाली होती तिला या आचार्यांचा विरोध होता. जैन साधूंनी भगवान महावीराप्रमाणे नग्न अवस्थेत आचरणाची आपण अनुकरण करावे असा त्यांचा आग्रह होता. त्यामुळेच या आचार्यांनी पाटलीपुत्र वाचनेत ठरलेल्या आगम ग्रंथांना मान्यता दिली नाही व जैनधर्माचे श्वेतांबर व दिगंबर असे पंथभेद दिसण्यास सुरुवात झाली.तथापि या दोन पंथामध्ये प्रत्यक्ष फूट पडण्यास बराच कालावधी लागला.

भगवान महावीरांच्या उपदेशाप्रमाणेच त्यांच्यानंतर थोड्याच काळात झालेल्या आचार्यांनी जे ग्रंथ संकलित केले त्यानाही आगम म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अंगग्रंथापासून वेगळेपण दर्शविण्यासाठी या आगमाना अंगबाह्य (प्रा. अंगबाहिर) आगम असे नाव देण्यात आले आहे. या प्रकारच्या ग्रंथापैकी काहींची वर्णने दिगंबर ग्रंथामधूनही आढळतात. त्यावरुन असे स्पष्ट होते की. पाटलीपुत्र वाचनेपूर्वीच ते संकलित झाले होते.

त्यांचे सध्याचे स्वरुप मात्र अंगग्रंथाप्रमाणेच पाचव्या शतकातील वलभी वाचनेनुसार आहे व ते दिगंबर संप्रदायाला मान्य नाही. अंगबाह्य आगमामध्ये आवश्यक सूत्र, दशवैालिक सूत्र, बृहत्कल्प सूत्र, व्यवहार सूत्र, दशाश्रुतस्कध सूत्र, निशीथसूत्र इत्यादींचा समावेश होतो.

**शुंग व कण्व**

सम्राट अशोकानंतर मौर्य साम्राज्याची सत्ता हळूहळू कमी होऊ लागली. महाराजा संप्रतिनंतर या साम्राज्यावर यवनाची आक्रमणे होऊ लागल्याने, त्यांच्यातील एकता नष्ट झाली. या परिस्थितीचा फायदा घेऊन इ.स.पू. दुस-या शतकात शुंग वंशातील ब्राह्मण सेनापती पुष्यमित्र याने वृहमित्र मौर्याचा वध केला व राजसत्ता बळकावली. पुष्यमित्र कट्टर ब्राह्मण होता, त्याने बौध्द व श्रमणावर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले असे म्हणतात. शुंगकाळाला ब्राह्मण धर्म पुनरुध्दार युग मानले जाते. पातंजलीच्या महाभाष्य व योगसूत्राची रचना याच काळात झाली. या काळात शिव व विष्णू पूजा, पौराणिक हिंदू धर्माचा मोठ्या प्रमाणात विकास झ ाल्याची माहिती मिळते. याच काळात ग्रीकांनी भारतावर आग्रमण करुन साकेतपर्यतच्या प्रदेशावर आपला अधिकार प्रस्थापित केला. दुसरीकडे कलिंगच्या खारवेल राजाने मगधावर आक्रमण केले. त्या आक्रमणात मगध राजाचा पराभव करुन नंद राजानी कलिंगचा पराभव करुन तेथून पाटलीपुत्रला नेलेल्या आदिजीन मूर्ती खारवेलने परत कलिंगला आणल्या. या संकटामुळेच बहुधा उज्जैनीच्या शेजारी विदिशा येथे एक शाखा स्थापन झाली असावी. बृहस्ततिमित्र हा या शाखेचा संस्थापक होता. त्यानंतर वसुमित्र व भानुमित्र हे सत्ताधिश झाले. उज्जैनीचे शुंग राजे ब्राह्मण धर्माचे उपासक असले तरी, जैनधर्माच्या बाबतीत त्यांनी सहिष्णू धोरण स्वीकारले होते.

**कण्व**

इ.स.पू. ७२-७३ च्या सुमाराला शेवटच्या शुंग राजाचा वध करुन, त्याचा ब्राह्मण मंत्री वसुदेव याने मगधावर कण्व घराण्याची सत्ता स्थापन केली. तथापि कण्व घराण्यातील सत्ताधीश फारसे बलवान नव्हते. सामान्यतः शुंग कण्व काळात मगधाची मध्यवर्ती सत्ता हतप्रभ असल्याने या काळात ग्रीक, शक, कुशाण इत्यादी परकीयांनी भारतात आक्रमण करुन आपली सत्ता स्थापन केली. जैन, बौध्द इत्यादी धर्मातील काही मूलभूत तत्वांचा अंतर्भाव करुन हिंदु धर्माला या काळात नवीन स्वरुप प्राप्त झाले. या हिंदु धर्म आंदोलनाचा परिणाम जैन व बौध्द धर्मावर थोड्याश्या प्रमाणात निसंशयपणे झाला. तथापि या काळातही जैनधर्माची कर्नाटक, मध्यभारत, सौराष्ट्र, मथुरा ही प्रमुख केंद्रे होती व या ठिकाणी जैन धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत होता असे दिसते.

**कलिंग**

प्राचीन भारतीय इतिहास काळात महत्वपूर्ण ठरलेल्या कलिंगच्या प्रदेशाची उत्तर सीमा गंगा नदी, दक्षिणेस गंजम जिल्ह्यातील घनदाट जंगले होती. पश्चिम सीमा मध्यप्रांतामधील अमरकंटक पर्वतापर्यत तर पूर्वेला समुद्र होता. दक्षिण कोसल किंवा महाकोसलचा समावेशही या प्रदेशातच होत होता. वैदिक साहित्यात कलिंगच्या प्रदेशाचा उल्लेख नाही. महाभारतात एक वन्य प्रदेशाच्या रुपात त्याचे वर्णन असून चित्रांगद या प्रदेशाचा राजा होता असे म्हटले आहे. धर्मसूत्रात या प्रदेशाला म्लेच्छ म्हटले आहे. यावरुन ब्राम्ह्ण परंपरेनुसार कलिंग देश चिरकाल एक अनार्य अवैदिक देश मानला जात होता. याविरुध्द जैन साहित्यात कलिंग देशाचे अनेक उल्लेख मिळतात. कलिंगमध्ये मिळणारे सर्वच्या सर्व पुरातत्वविशेष जैन आहेत यावरुन या देशात प्राचीन काळापासूनही जैन तीर्थकारांची प्रतिष्ठा होती असे दिसते. या देशाच्या वा राज्याच्या इष्टदेवाला ‘कलिंग जिन’ म्हणतात. कलिंग जिन ही संज्ञा प्रथम तीर्थंकर ऋषभदेव, १० वे तीर्थंकर शीतलनाथ, २३ वे तीर्थंकर पार्श्र्वनाथ यांच्यापैकी कोणसाठी वापरली असावी याबद्दल विव्दानात एकमत नाही.

तीर्थंकर पार्श्वनाथांचा विहार कलिंगच्या प्रदेशात झाला होता. भगवान महावीरही येथे आले होते व राजधानी कलिंग नगराच्या शेजारीच असलेल्या कुमारी पर्वतावर त्यांचे समवसरण झाले होते. या स्मृतीच्या प्रीत्यार्थ म्हणून या ठिकाणी स्तूपादी स्मारकही बांधण्यात आले होते. मुनींच्या निवासासाठी म्हणून गुंफाही बांधण्यात आल्या होत्या. ज्या गुंफा खारवेलच्या काळातही व्यवस्थित स्वरुपात अस्तित्वात होत्या. यावरुनच डॉ. राखालदास बॅनर्जीच्या मते ओरिसा प्रदेश प्रथमपासूनच जैनधर्माचे प्रमुख केंद्र असावे. या प्रदेशात आर्यसंस्कृती किंवा संस्कृतीचा प्रसार करण्याचे श्रेय जैनधर्मालाच आहे.

इ.स.पू. ६व्या शतकात कलिंगच्या प्रदेशावर जितशत्रु नावाच्या राजाचे राज्य होते. जो महावीरांचा पिता सिध्दार्थचा मित्र होता. याची कन्या यशोदा हिच्याबरोबर महावीरांचा विवाह करण्याचाही विचार चालू होता. तथापि महावीरांनी आजन्म ब्रह्मचारी राहण्याचा दृढनिश्चय केलेला असल्याने हा विवाह होऊ शकला नाही. जितशत्रु संभवतः कोणत्या तरी विद्याधर नावाच्या वंशाशी संबधीत होता. त्याच्या वंशजांनी नंदकाळापर्यंत या प्रदेशावर अनिर्बंधपणे राज्यकारभार केला. इ.स.पू. ४२४ च्या सुमारास मगध नरेश नंदवर्धननी कलिंगवर आक्रमण केले व त्या राज्याला आपल्या साम्राज्यात समाविष्ट केले.बहुधा हा नंद राजा स्वतः जैन असावा, कलिंगच्या राजधानीच्या ठिकाणी प्रतिष्ठित असलेल्या कलिंग जिनाच्या भव्य मूर्ती आपल्याबरोबर तो घेऊन गेला व पाटलीपुत्राला त्या मूर्तीची स्थापना केली. ई.स.पू.३६४ मध्ये कलिंगमध्ये राज्यक्रांती होऊन हा प्रदेश पुन्हा स्वतंत्र झाला. यावेळी कलिंगच्या प्रदेशावर गंगवंशाची सत्ता स्थापन झाली असावी. यानंतरच्या काळात नंदराजानी कलिंगच्या प्रदेशावर आक्रमण केले नाही. चंद्रगुप्त मौर्यालाही या प्रदेशाकडे लक्ष देण्याला फारसा वेळ मिळाला नाही. बिंदुसारानी कलिंगच्या राजाबरोबर मित्रत्वाचे संबंध ठेवले होते. तथापि अशोकाने साम्राज्य विस्तारार्थ कलिंगच्या प्रदेशावर आक्रमण केले. यावेळी कलिंगचे राज्य एक शक्तिशाली साम्राज्य बनलेले असून, त्याचे व्यापारी संबंधही मोठमोठ्या राज्याबरोबर प्रस्थापित केले होते. इ.स.पू. २६१ मध्ये अशोकाने मोठ्या सैन्यानिशी कलिंगवर आक्रमण केले. या भीषण युध्दात दीड लाख लोक पकडले गेले व एक लाख मारले गेले. या भीषण नरसंहारानी अशोकाला विचलित केले, त्याचे मतपरिवर्तन होऊन तो एक शांतिप्रिय धर्मात्मा राजा बनला. इ.स.पू ३ -या शतकात शेवटापर्यत सम्राट संप्रतिच्या काळात कलिंग पुन्हा स्वतंत्र झाले व तेथे एका नवीन राजवंशाची स्थापना झाली. हा नवीन वंश जैनधर्मानुयायी होता. प्राचीन राजवंशाबरोबर या वंशाचा काय संबंध होता हे निश्चितपणे सांगता येत नाही. खारवेलच्या शिलालेखानुसार या वंशाचे नाव 'ऐल' होते.व ही चेदि वंशाची शाखा होती. तत्कालीन राजाचे नांव क्षेमराज होते. काही विद्वानांच्या मते क्षेमराजाचा पुत्र बुध्दीराज होता. त्याचा पुत्र भिक्षुराज खारवेल होता. कित्येक विद्वानांच्या मते या सर्व खारवेलांच्याच उपाधि आहेत. तथापि ही गोष्ट स्पष्ट आहे की, खारवेलच्या पितामहानीच संप्रतीच्यावेळी आपल्या राज्यवंशाच स्थापना केली व कलिंगला स्वातंत्र्य मिळाविले. महाराज सम्राट खारवेलाची माहिती हाथीगुंफाच्या प्रसिध्द शिलालेखाच्या आधाराने मिळते. हा इतिहास प्रसिध्द शिलालेख ओरिसा प्रदेशातील पुरी जिल्ह्यातील उत्तरेकडील प्रदेशातील उदयगिरी नावाच्या पर्वतावर हाथीगुंफा नावाच्या विशाल प्राचीन गुंफा मंदिराच्या प्रवेशव्दार किंवा छतावर कोरलेला आहे. हा शिलालेख १७ ओळींचा आहे. लेखाच्या बरोबरच मुकुट, स्वस्तिक, नन्द्यावर्त, अशोक वृक्ष, इत्यादी जैन सांस्कृतिची मंगल प्रतिकेही कोरलेली आहेत. उपर्युक्त शिलालेख इ.स. १८२५ मध्ये स्टलिंग नावाच्या इंग्रज विद्वानाच्या दृष्टोत्पत्तीस पडला. तेव्हापासून गेल्या शंभर वर्षात अनेक भारतीय व पाश्चिमात्य विद्वानांनी या शिलालेखाविषयी उहापोह केला आहे.

शिलालेखाच्या सुरुवातीस अरहंत व सिध्दांना नमस्कार केला आहे. चारी दिशांचा आधारस्तंभ, सर्व गुणांनी विभुषित महाराजा खारवेलनी हा लेख खोदला असे म्हटले आहे. या शिलालेखात महाराज खारवेलच्या जीवन कार्याची माहिती दिली आहे. खारवेलांनी वयाची पहिली पंधरा वर्षे युवराज अवस्थेत क्रिडा करण्यात घालविली. त्यानंतर लेखन, चित्रकला, गणित,व्यवहार धर्मश राज धर्म, शासन-व्यवस्था इत्यादी विषयांचा त्यानी अभ्यास केला व युवराज म्हणून शासन कारभारही पाहिला. वयाच्या २४ व्या वर्षी त्याला महाराज्याभिषेक करण्यात आला.

सत्तेवर येताच पहिल्या वर्षी वादळ व दैवी प्रकोपामुळे नष्ट झालेली, गोपुरे, प्राकार, प्रासाद इत्यादींचा त्याने जीर्णोध्दार केला. उद्यानांची पुनः बांधणी केली व पस्तीस लाख प्रजाजनांना सुखी केले. दुस-या वर्षी सातवाहन राजा शातकर्णीची पर्वा न करता, त्याचे आपले हत्ती, पदाति, रथ, इत्यादी विशाल सेना पश्चिमेला पाठविली. तिस-या वर्षी मनोरंजनार्थ गंधर्वविद्या विशारद असलेल्या या नृपतीने गायन व वादनाचे कार्यक्रम आयोजित केले. चौथ्या वर्षी रठ्ठिक व भोजक नावाच्या राजाचा त्याने पराभव करुन त्यांना पराभव स्वीकारण्यास भाग पाडले. आठव्या वर्षी आपल्या विशाल सेनेसह उत्तर हिंदुस्थानावर आक्रमण करण्यास गेला. गोरथगिरी (गया जिल्ह्यातील बराबर पर्वत) वर भयंकर युध्द करुन राजगृह राजांना त्रस्त केले व त्याच्या भयानेच यवनराज दिमित्र आपले सैन्य इतस्ततः सोडून मथुरेहून पळून गेला. नवव्या वर्षी याचकांसाठी त्याने मोठ्या प्रमाणात दानधर्म केला. महाविजय प्रासाद नावाचा विशाल व सुंदर राजवाडा बांधला. बाराव्या वर्षी उत्तर हिंदुस्थानावर पुन्हा आक्रमण करुन, मगधराजाचा पूर्णपणे पराभव केला. पूर्वी नंदराजांनी कलिंगहून नेलेल्या ‘कलिंग जिना’ च्या प्रतिमा तसेच अंग व मगध राज्यातील बहुमोल रत्ने, धनसंपत्ति, घेऊन तो परत आला. मिळवलेल्या या संपत्तीतून त्याने अनेक रत्नजडीत मंदीरांची उभारणी केली. त्याचवर्षी दक्षिणेतील पांड्य राजानी मणि, माणिक,घोडे,हत्ती इत्यादीसह मूल्यवान नजराणा खारवेलाला पाठविला. अशाप्रकारे आपले प्रजाजन व मांडलिक राजांना त्याने सुखात ठेवले व आपल्या पराक्रमाने साम्राज्याचा विस्तार केला. आपल्या कारकिर्दीच्या शेवटच्या १३ व्या वर्षी कुमारी पर्वतावर अर्हंतांची मंदिरे बांधली. तपस्वी मुनींना निवास करण्यासाठी गुंफा बांधल्या. स्वतः श्रावकाचे व्रत ग्रहण केले. अर्हंत मंदिराच्या शेजारी त्याने एक सुंदर विशाल सभामंडप बांधला. त्याच्या मध्यभागी रत्नजडीत मानस्तंभाची स्थापना केली. त्या सभामंडपात त्याने जैन मुनींचे संमेलन भरविले. या संमेलनार्थ दूरदूरच्या ठिकाणाहून जैन मुनि आले होते. या मुनि संमेलनात राजानी शांतिदायी व्दादशांग श्रुताचे पठण केले अशाप्रकारे या क्षेमराज, वृध्दिराज, भिक्षूराज, धर्मराज म्हणून ओळखिल्या जाणा-या खारवेल राजाने भगवानाच्या त्या कल्याणकारी वाणीच्या संबंधात प्रश्न विचारुन, त्याचे उत्तर ऐकण्यात, चिंतन करण्यात आपण काळ व्यतीत केला. विशिष्ठ गुणांमुळे सदैव दक्ष, समस्त धर्माचा आदर करणारा, धर्मसंस्थाचा उध्दार, सुधार व संस्कार करणारा, अप्रतिहत चक्रवाहन, सतत विजयी, साम्राज्य संचालक व संरक्षक, महाविजयी असा हा खारवेल राजा झाला.

काळाच्या दृष्टीने या शिलालेखाकडे पाहिल्यास सम्राट अशोकाच्या शिलालेखांच्या खालोखाल या शिलालेखाचे महत्व आहे. ऐतिहासिक महत्वाच्या दृष्टीने सबंध भारतातील उपलब्ध शीलालेखात या शिलालेखाला महत्वाचे स्थान आहे. त्या काळातील हा एकच शिलालेख सांगता येईल की, ज्यात वंश, वर्ण संख्या, तत्कालीन लोकसंख्या, देश, जाती, पद-नाम इत्यादी बहुमोल ऐतिहासिक सांधनांचा स्पष्टपणे उल्लेख आहे. कलिंग देशाची तत्कालीन राजनैतिक, सामाजिक व धार्मिक अवस्था, राजाची योग्यता, युवराजाचे शिक्षण व प्रजेविषयक राजाचे कर्तव्य इत्यादी विषयांचे सुंदर दिग्दर्शन या शिलालेखात आले आहे. हा शिलालेख खोदणारा राजा जैन होता याविषयी दुमत नाही. त्यामुळेच जैन धर्माच्या इतिहासातही या शिलालेखाला महत्वाचे स्थान आहे. भद्रबाहु श्रुतकेवलीनंतर आगम ज्ञानाचा -हास, खारवेलाव्दारे जैनधर्म उन्नतीचे प्रभाव, मुनि संमेलन इत्यादी विषयांची माहिती या आलेखात आली आहे. त्याचबरोबर हा लेख खारवेलाचे जीवन, दिग्विजय, चरित्र, लाकोपकार चार महत्त्वाच्या युध्दआघाडयांच्या सहयांने पाटलीपुत्राच्या आसपासचे राजे, कामरुप, नेपाळ, हिमालयाच्या पायथ्याचे राजे, पंजाबातील व इतर सत्ताधीश व दक्षिण भारतातील कांचीपर्यंतचे निरनिराळे राजे यांना पराभूत राजे यांना पराभूत केले व आपल्या महान् पराक्रमाच्या आधारावर संपूर्ण भारतावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. या सम्राटांच्या विजयाचे, गुणप्रियतेचे, कलाप्रियतेचे वर्णन त्याच्या अलाहाबाद येथील संस्कृत प्रशस्तीत (शिलालेखात) आले आहे. समुद्रगुप्त विद्याव्यासंगी, संगीत व कलेचा प्रेमी, वीर, पराक्रमी, कुशल सेनानायक, महान् योध्दा, उदार, दानी होता. वैदिक धर्माचा त्याने स्वीकार केलेला असला तरी परधर्मसहिष्णुता हे त्यांचे श्रीद होते.

रामगुप्त

समुद्रगुप्तानंतर त्याच्या जेष्ठ पुत्र रामगुप्त गादीवर आला. तथापि तो निर्बल असल्याने निरनिराळया मांडलिकानी उठाव केला व शकक्षत्रपानी तर गुप्त सम्राज्यावर आक्रमण केले. या आक्रमणात रामगुप्त

पराभूत झाला. यावेळी त्यानी शकांबरोबर केलेल्या मानहानीच्या स्वरुपाच्या तहामधुन गुप्त साम्राज्याची सुटका करण्याचे कार्य चंद्रगुप्तनी केले व या विजयानंतर तो गुप्तांचा सम्राट बनला. या पराक्रमाच्या सहाय्याने आपल्या पराक्रमी पित्याप्रमाणेच विजय मिळवून गुप्तांचे साम्राज्य बलवान व विस्तारित बनवून, खऱ्या अर्थाने सुवर्णयुग प्रस्थापित करण्याचे कार्य चंद्रगुप्तानी केले.

गुजराथमधील शकक्षत्रपांचा त्यानी पराभव केला. या विजयामुळे उत्तर हिंदुस्थानात गुप्तांची एकमेव सत्ता स्थापन झाली, त्याचबरोबर तेथे असणारे सोपारा हे बंदर गुप्तांच्या ताब्यात आले. या बंदराच्या सहाय्याने या काळातील व्यापाऱ्यांना युरोपीय राष्ट्राबरोबर प्रत्यक्ष व्यापार करता येऊ लागला व युरोपीय राष्ट्राकडून खऱ्या अर्थाने सुवर्णाचा ओघ भारतीय प्रदेशाकडे सुरु झाला. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या नागवंशीय राजाची कन्या कुवेरनागा हिच्याबरोबर केलेल्या विवाहातून चंद्रगुप्ताला प्रभावीत गुप्ता ही मुलगी झालेली होती. चंद्रगुप्तानी तिचा विवाह वाकाटक राजा रुद्रसेन याच्याबरोबर केला व वाकाटकाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्या मदतीनेच त्याने शकक्षत्रपांचा विनाश केला. पुढील काळात रुद्रसेन लवकरच मरण पावल्याने वाकाटकांच्या दरबारात गुप्तांचे महत्व मोठया प्रमाणात प्रस्थापित झाले. अशा प्रकारे आपल्या पित्याच्या कारकीर्दीत शक व वाकाटक या राहिलेल शुत्रंचाही चंद्रगुप्तानी विरोध मोडून काढला व गुप्तसाम्राज्याला भारतातील एकमेव बलवान साम्राज्य बनविले. साहित्य, कला इत्यादि विविध क्षेत्रातील गुणी विद्वानांचा हा आश्रयदाता होता. भागवत धर्माचा स्वीकार या राजांनी केलेला असला तरी तो सर्वधर्मसहिष्णु, उदार, दानशिल नीतीनिपुण, न्यायपरायण व पराक्रमी होता. या समुराला भारतात आलेल्या फहियान या चितनी इतिहासकाराने वर्णन केले आहे की, “ या काळातील समाज जीवहिंसेच्या विरोधी होत, सर्वजण सुखी होते, शिक्षा अतिशय अल्प प्रमाणात दिली जात होती. राजपुरुष न्यायी व इमानदार होते. दारुचे नावही घेतले जात नसे. कित्येक राजांनी विहार, मठ बनविले होते जेथे श्रमण भिक्षु इत्यादींची राहण्याची योग्य व्यवस्था होत होती. मध्य भारतातील शहरे विशाल व वैभवसंपन्न होती. ठिकठिकाणी औषधालये व धर्मशाला उघडलेल्या होत्या. सर्वसामान्य समाज या संस्थांना मोठया सिध्दहस्ताने मदत करीत होता.” यावरुन या काळातही समाजात बोध्दधर्माचे स्थान अस्तित्वात होते असे दिसते.

## कुमारगुप्त पहिला

कुमारगुप्त प्रथम (महेंद्रदित्य) चंद्रगुप्ताचा हा ध्रुवदेवीपासून झालेला मुलगा. याच्या काळात गुप्तांचे विशाल साम्राज्य अक्षुण्ण राहिले. या सुमारास गुप्तांची शक्ति उच्चांकाच्या परम शिखरावर असून, सर्वत्र सुख-शांती व समृध्दि होती. सम्राटाने भागवत धर्माचा पुरस्कार केलेला असला तरी जैन, बौध्द इत्यादि धर्म या काळात स्वतंत्ररीत्या प्रगति करीतच होते. समाजात त्या धर्मांना मान्यता होती. पुण्यमित्र नावाच्या टोळयांनी लोकरंजनार्थ कार्य, प्रजावत्सलाता, धार्मिकता इत्यादी विविध कार्याची माहिती देणारा आहे. या असामान्य पराक्रमावरुन त्याची तत्कालीन महान सम्राटांमध्ये गणना करण्यात येते. अवघ्या १३ वर्षाच्या काळात आपल्या साम्राज्याला सर्वतोमुखी उन्नतीच्या परमोक्ष शिखरावर त्याने नेलेले दिसते. यानंतरही तो काही काळ जिवंत असावा, तथापि त्याविषयी माहिती मिळण्यास साधन उपलब्ध नाही. खारवेलांनी प्रस्थापित केलेल्या गुहामंदिरातील स्थापत्य मूर्तीचींही कलामर्मज्ञानी मुक्त कंठाने स्तुती केली आहे. जैन धर्माच्या इतिहासामध्ये खारवेल राजा व त्याच्या कार्याला अनन्यसाधारण स्थान आहे.

महाराजा खारवेलच्या उपर्युक्त शिलालेखाशिवाय त्याच काळातील काही शिलालेख खंडगिरी उदयगिरी पर्वतावरील निरनिराळ्या गुंफामधून मिळाले असून, त्यात खारवेलाची राणी, वंशज कुदेपश्री, राजकुमार बडुख, नगरन्यायाधिश भूति, कम्म, हलखिण, चूलकम्प महाबारिया,कुसुम इत्यादी निरनिराळ्या व्यक्तीनी लेण्या, गुंफा बांधल्याची माहिती दिली आहे. या विविध शिलालेखावरुन स्पष्ट होते की, खारवेलानंतरही कित्येक शतकापर्यत खंडगिरी, उदयगिरी गुंफा पवित्र तीर्थ व जैन श्रमणाचे आश्रयस्थान बनलेले होते की, खारवेलानंतरही कित्येक शतकापर्यत खंडगिरी, उदयगिरी गुंफा पवित्र तीर्थ व जैन श्रमणाचे आश्रयस्थान बनलेले होते. तसेच कलिंगच्या राजवंशामध्ये, राज्य कर्मचा-यामध्ये व सर्वसामान्य लोकात

जैनधर्म प्रभावशाली होता. सातवाहन राजानी इ.स. पहिल्या शतकात कलिंगच्या बहुतांशी प्रदेशावर आक्रमण करुन आपली सत्ता स्थापन करीपर्यत खारवेलचा वंश या प्रदेशावर व्यवस्थित प्रकारे राज्य करीत होता.

## गुप्तकाळ व जैनधर्म

इ.स. चौथ्या शतकात भारतात गुप्त राजवंशाची स्थापना होऊन प्राचीन भारतीय इतिहासाच्या उत्तरार्धाला सुरुवात झाली. या वंशाच्या स्थापनेपासून भारतीय इतिहासात एक नवीन पर्वाची सुरुवात झाली. शिलालेख वाङ्मय, नाणी, परकीयांचे प्रवासवृत्त इत्यादी विविध इतिहास साधने या काळाची माहिती देण्यास उपयुक्त आहेत. त्यामुळेच या काळातील राजे, त्यांचे कार्य, तत्कालीन धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती, साहित्य व कला इत्यादी क्षेत्रातील प्रगती इत्यादी विविध विषयांची योग्य माहिती मिळविता येते. गुप्तकाळात राष्ट्रगाथा, वीरगाथा, प्रेमगाथा, पुराण, महाकाव्य, आख्यान, नाटक इत्यादी विविध साहित्य क्षेत्रात असामान्य प्रगति झाली. कालिदासासारख्यानी साहित्य क्षेत्रात कार्य केले तर वराहमिहीरासारख्या विव्दानांनी गणित, ज्योतिष इत्यादी क्षेत्रात नाव मिळविले. स्थापत्य, चित्र, शिल्प इत्यादी कलामध्ये प्रगति झाली. नृत्य, गायन यासारख्या कलांना राजाश्रय मिळाला. सर्व गुप्तराजे विद्याप्रेमी असल्याने शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगति झाली. गुप्तकाळातील ही सर्वागीण प्रगती लक्षात घेऊनच या काळाला सुवर्णयुग असे म्हणण्यात येते.

## चंद्रगुप्त पहिला व समुद्रगुप्त

गुप्त वंश हा प्राचीन व्रात्य जातीचाही एक असा वंश होता की, ज्यानी वैश्य कार्याचा अवलंब केला होता. प्राचीन काळात विशेषतः श्रमण परंपरेनुसार व्रात्य इत्यादीमध्ये वर्ण जन्मतः नसून कर्मतः होता व वर्णपरिवर्तन सहजशक्य असून ते व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून होते. गुप्त घराण्याचा संस्थापक श्रीगुप्त याने नालंदाच्या शेजारी ५० मैलावर पूर्वेला आपल्या छोट्या राज्याची स्थापना केली. श्रीगुप्त व त्याचा उत्तराधिकारी घटोत्कच यांनी 'महाराज' हीच पदवी लावलेली दिसते त्याचा मुलगा चंद्रगुप्त (प्रथम) यांनी 'महाराजाधिराज' पदवी लावलेली आहे.यावरुन या काळात राज्यविस्ताराला सुरुवात झालेली असावी. या सुमारास तत्कालीन राजसत्तामध्ये लिच्छवीचे गणराज्य बलवान होते. चंद्रगुप्तानी लिच्छवी राजाची मुलगी कुमारदेवी हिच्याशी विवाह करुन तत्कालीन सत्ताधिशामध्ये गुप्त घराण्याला समान स्थान मिळविले. या संबंधामुळे पाटलीपुत्रावर चंद्रगुप्ताची सत्ता स्थापन झाली व पश्चिमेकडे राज्यविस्तार करण्याचे कार्य त्यानी केले. यानंतर सत्तेवर आलेला समुद्रगुप्त प्रतापी व महान राजा म्हणून व त्याच्या दिग्विजयामुळे इतिहासात प्रसिध्द आहे. समुद्रगुप्तानी आपल्या कारकीर्दीत चार महत्वाच्या युध्दआघाड्यांच्या साह्याने पाटलीपुत्राच्या आसपासचे राजे, कामरुप, नेपाळ, हिमालयाच्या पायथ्याचे राजे, पंजाबातील गणराज्ये व इतर सत्ताधिश व दक्षिण भारतातील कांचीपर्यतचे निरनिराळे राजे यांना पराभूत केले व आपल्या महान पराक्रमाच्या आधारावर संपूर्ण भारतावर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. या सम्राटांच्या विजयाचे, गुणप्रियतेचे, कलाप्रियतेचे वर्णन त्याच्या अलाहाबाद येथील संस्कृत प्रशस्तीत(शिलालेखात) आले आहे. समुद्रगुप्त विद्याव्यासंगी, संगीत व कलेचा प्रेमी, वीर, पराक्रमी, कुशल सेनानायक, महान योध्दा, उदार, दानी होता. वैदिक धर्माचा त्याने स्वीकार केलेला असला तरी परधर्मसहिष्णुता हे त्यांचे ब्रीद होते.

## रामगुप्त

समुद्रगुप्तानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र रामगुप्त गादीवर आला. तथापि तो निर्बल असल्याने निरनिराळ्या मांडलिकांनी उठाव केला व शकक्षत्रपानी तर गुप्त साम्राज्यावर आक्रमण केले. या आक्रमणात रामगुप्त पराभूत झाला. यावेळी त्यानी शकांबरोबर केलेल्या मानहानीच्या स्वरुपाच्या तहामधून गुप्त साम्राज्याची सुटका करण्याचे कार्य चंद्रगुप्तानी केले व या विजयानंतर तो गुप्तांचा सम्राट बनला. या पराक्रमाच्या सहाय्याने आपल्या पराक्रमी पित्याप्रमाणेच विजय मिळवून गुप्तांचे साम्राज्य बलवान व विस्तारित बनवून, ख-या अर्थाने सुवर्णयुग प्रस्थापित करण्याचे कार्य चंद्रगुप्तानी केले.

गुजराथमधील शकक्षत्रपांचा त्यानी पराभव केला. या विजयामुळे उत्तर हिदुस्थानात गुप्तांची एकमेव सत्ता स्थापन झाली, त्याचबरोबर तेथे असणारे सोपारा हे बंदर गुप्तांच्या ताब्यात आले. या बंदराच्या सहाय्याने या काळातील व्यापा-याना युरोपीय राष्ट्राबरोबर प्रत्यक्ष व्यापार करता येऊ लागला व युरोपीय राष्ट्राकडून ख-या अर्थाने सुवर्णाचा ओघ भारतीय प्रदेशाकडे सुरु झाला. हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या नागवंशीय राजाची कन्या कुबेरनागा हिच्याबरोबर केलेल्या विवाहातून चंद्रगुप्ताला प्रभावती गुप्ता ही मुलगी झ ाालेली होती. चंद्रगुप्तानी तिचा विवाह वाकाटक राजा रुद्रसेन याच्याबरोबर केला व वाकाटक बरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्या मदतीनेच त्याने शकक्षत्रपांचा विनाश केला. पुढील काळात रुद्रसेन लवकरच मरण पावल्याने वाकाटकांच्या दरबारात गुप्तांचे महत्व मोठ्या प्रमाणात प्रस्थापित झाले. अशा प्रकारे आपल्या पित्याच्या कारकीर्दीत शक व वाकाटक या राहिलेल्या शत्रूंचाही चंद्रगुप्तानी विरोध मोडून काढला व गुप्तसाम्राज्याला भारतातील एकमेव बलवान साम्राय बनविले. साहित्य, कला इत्यादी विविध क्षेत्रातील गुणी विव्दानांचा हा आश्रयदाता होता. भागवत धर्माचा स्वीकार या राजांनी केलेला असला तरी तो सर्वधर्मसहिष्णु, उदार,  दानशील, नीतिनिपुण, न्यायपरायण व पराक्रमी होता. या सुमाराला भारतात आलेल्या फाहियान या चिनी इतिहासकाराने वर्णन केले आहे की, ‘‘या काळातील समाज जीवहिंसेच्या विराधी होता, सर्वजण सुखी होते, शिक्षा अतिशय अल्प प्रमाणात दिली जात होती. राजपुरुष न्यायी व इमानदार होते. दारुचे नावही घेतले जात नसे. कित्येक राजांनी विहार, मठ बनविले होते जेथे श्रमण भिक्षु इत्यादींची रहाण्याची योग्य व्यवस्था होत होती. मध्य भारतातील शहरे विशाल व वैभवसंपन्न होती. ठिकठिकाणी औषधालये व धर्मशाळा उघडलेल्या होत्या. सर्वसामान्य समाज या संस्थांना मोठ्या सिध्दहस्ताने मदत करीत होता.’’ यावरुन या काळातही समाजात बौध्दधर्माचे स्थान अस्तित्वात होते असे दिसते.

**कुमारगुप्त पहिला**

कुमारगुप्त प्रथम (महेंद्रादित्य) चंद्रगुप्ताचा हा ध्रुवदेवीपासून झालेला मुलगा. याच्या काळात गुप्तांचे विशाल साम्राज्य अक्षुण्ण राहिले. या सुमारास गुप्तांची शक्ति उच्चांकाच्या परम शिखरावर असून, सर्वत्र सुख-शांति व समृध्दि होती. सम्राटाने भागवत धर्माचा पुरस्कार केलेला असला तरी जैन, बौध्द इत्यादी धर्म या काळात स्वतंत्ररित्या प्रगति करीतच होते. समाजात त्या धर्माना मान्यता होती. पुण्यमित्र नावाच्या टोळ्यांनी मिळालेला असून तज्ञांच्या मते तो इ.स. ४२४ च्या सुमाराचा आहे. शिलालेखवरुन अनुमान निघते की, ‘‘आचार्य भद्रबाहूच्या संप्रदायातील शांकर नावाच्या शिष्याने भगवान पार्श्वनाथाची मूर्ति स्थापन केली.’’ एवढा काळ लोटूनही मूर्ति जशीच्या तशीच आहे.भगवान पार्श्वनाथांचे लांछन चिन्ह असून त्याचबरोबर पाठीमागे नागाचा मोठा फणा आहे. शांकर मुनींच्या पित्याचे नाव सांधिला होते, त्यांना अश्वपति ही उपाधि होती. यावरुन सिध्द होते की, या काळातील मोठमोठे सरदार, महाराजे यांच्यावर जैनधर्माचा प्रभाव होता. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे याच पर्वतावर हिंदूचेंही दोन मोठे शिलालेख मिळाले आहेत व त्या प्रांतवर गुुप्तांची पूर्णपणे सत्ता होती. विहार करताना शांकरमुनि या प्रदेशात गेले व तिथे त्यांनी पार्श्वनाथांच्या मूर्तीची स्थापना करुन या ठिकाणाना जैनांचे पवित्र क्षेत्र बनविले. यावरुन या काळात सर्व धर्मीय समाजात एकजुटीने राहत असावेत व जरी एका धर्माला राजाश्रय असला, तरी दुस-या धर्मावर आघात केला जात नसावा असे दिसते.

सुमारे इ.स. ४३२ चा दुसरा एक शिलालेख मथुरेजवळ कैकालितिला येथे मिळाला आहे. तेथे एका मंचकावर तीर्थंकरांची मूर्ति विराजमान असून मूर्तीच्या खाली, “आचार्य धर्तिलाचार्य कोटिम्य गब्ब तथा विद्याधर शावमजी यांच्या अनुज्ञेनुसार गृहमित्र पालिता नावाच्या शासकाच्या पत्नीकडून समर्पण” असे लिहिले आहे.मथुरा हे जैन संस्कृतीचे महान केंद्र होते. त्यामुळे या शिलालेखाचा उल्लेख मोठ्या गर्वाने करण्यात येतो. येथे धर्मशील, विव्दान, दानशूर  लोक मोठ्या प्रमाणात येत असून मथुरेच्या महानतेचा उल्लेख चिनी प्रवाश्यांनीही केला आहे.

**स्कंदगुप्त-**

स्कंदगुप्ताचा मोठा बंधु पुरुगुप्त त्याचा प्रतिव्दंदी होता. तथापि पुष्यमित्र टोळ्यांचा पराभव केल्यामुळे हो लोकप्रिय झाला होता. त्यामुळे पित्याच्या मृत्यूनंतर स्कंदगुप्त साम्राज्याचा अधिपती झाला. तथापि याच्या कारकीर्दीत गुप्तांच्या साम्राज्यावर हूणांचे मोठ्या प्रमाणावरील आक्रमण झाले, त्या आक्रमणाला स्कंदगुप्तानी मोठ्या शौर्यान तोंड दिले व आक्रमकांचा पूर्णपणे पराभव केला. या काळात गुप्त साम्राज्य अक्षय राहिले असले तरी, या युध्दाचा राजकोषावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला. स्कंदगुप्त हा गुप्तांचा शेवटचा पराक्रमी राजा होय. गोरखपूर जिल्ह्यातील करुणगाव येथे स्कंदगुप्ताच्या काळातील २४ फूट ४ इंच स्तंथावर एक शिलालेख खोदलेला आढळतो. त्या लेखावरुन माहिती मिळते की, चंद्र नावाच्या व्यक्तीला जीवनातल्या क्षणभंगुरतेचे ज्ञान झाले व त्यानी पाच तीर्थंकरांच्या मूर्तींची स्थापना केली. आदिनाथ, शांतिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ व महावीर या पाच तीर्थकरांच्या मूर्तीच्या खालील बाजूला शिलालेख आहे. या शिलालेख आहे. या शिलालेखावरुन चौथ्या व पाचव्या शतकातील जैनधर्म व समाजीची माहिती मिळते.

यानंतरच्या काळात गुप्तांच्या सत्तेवर पुरुगुप्त, नरसिंहगुप्त, कुमारगुप्त व्दितीय इत्यादी राजे आले. तथापि त्यांच्यापैकी कोणीही बलवान नसल्याने, तसेच हूणांच्या आक्रमणामुळे गुप्तांच्या साम्राज्याचे तुकडे तुकडे होऊन निरनिराळे मांडलिक राजे स्वतंत्र झाले. महासेन गुप्तांच्या काळात माळव्याच्या प्रदेशावर गुप्तांची सत्ता टिकू शकली .

महासेन गुप्तचा पुत्र देवगुप्ताने या प्रदेशावर आपली स्वतंत्र सत्ता कायम टिकविली. बंगालच्या शशांक राजाला सहकार्य करुन त्याने मौखरी राजा गृहवर्मन याला युध्दात पराभूत केले. तथापि गृहवर्मनचा मेहुणा थानेश्वरचा राज्यवर्धन याने देवगुप्ताचा पराभव केला. देवगुप्त हा जै्न धर्मानुयायी होता. पराभवामुळे संसारातून त्याचे मन विरक्त झाले व आपल्या वंशातील जैनमुनि हरिगुप्तकडून दीक्षा घेऊन त्याने मुनीत्व स्वीकारले. यानंतरच्या काळात गुप्तवंश सामान्यतः नामशेषच झाला. समुद्रगुप्तापासून स्कंदगुप्तापर्यतचा दीडशे वर्षाचा काळ हा गुप्तांच्या साम्राज्याचा अभ्युदयाचा काळ असला तरी, चौथ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यत तीनशे वर्षाचा काळ हा भारतीय इतिहासात गुप्तकाळ समजला जातो. ह्या काळाला सुवर्णगुण असे म्हणतात. आपल्या परमोत्कर्ष काळात गुप्त साम्राज्य ‘आसमुद्रक्षितीज’ होते.प्रांतिक व नागरी शासनसंस्था सुव्यवस्थित होती. न्यायविधान उदार होते. सर्वत्र सुख, शांति व समृध्दि होती. विविध उद्योगधंदे व व्यापार, श्रेणी व निगमांच्या सहाय्याने सुसंगठीत अत्यन्नत दशेत होता. आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच परराष्ट्रीय व्यापारही मोठ्या प्रमाणात व प्रगतिशील अवस्थेत होता. उत्तर भारतात या काळात नागर वा पंचरत्न शैलीच्या शिखरबंद मंदिराची निमिर्ती होण्यास प्रारंभ झाला. जैन, बौध्द व वैष्णव मूर्तिकलेमध्येही मोठ्या प्रमाणात प्रगति झाली. देवगड व भिंतारी येथील विष्णु मंदीर, देवगढ येथील जैन मंदीर या काळातील उल्लेखनीय मंदिरे आहेत. चित्रकला व संगीताच्या क्षेत्रातही या काळात भरीव कामगिरी झाली. महाकवि कालिदास, भारवि, सुबंधु, दंडी, बाण इत्यादि अनेक कवींनी साहित्य समृध्द केले तर वराहमिहिर, आर्यभट्ट, अमरसिंह, पूज्यपाद इत्यादींनी विज्ञानात व दिङ्ःनाग, वसुबंधु भर्तृहरी, पात्रकेसरी, सिध्दसेन इत्यादींनी दर्शन व न्याय इत्यादी क्षेत्रात मोलाची भर घातली. भारतीय धर्म व संस्कृतीचा प्रसार भारताबरोबरच मलाया,जावा,

सुमात्रा, कंबोडिया, बोर्निओ, चंपा इत्यादी विविध देशामध्ये मोठ्या प्रमाणात झाला. चिनी प्रवाशानी या देशातील भारतीय धर्म, संस्कृती व व्यापाराच्या प्रभावाची माहिती दिली आहे.

गुप्तकालीन समाजात भागवत, बौध्द व जैन धर्म मान्यवर होते. राज्यसत्ताधिशांनी यापैकी कोणत्याही एका धर्माला राजाश्रय दिलेला दिसतो. काही राजे भागवत धर्मीय, काही बौध्द तर काही जैन धर्मीय असल्याची माहिती मिळते. सत्ताधीशांनी कोणत्याही धर्माला राजाश्रय दिला तरी, इतर धर्माकडेही सहिष्णुतेच्या भूमिकेतूनच ते पहात असत. राजघराण्यातील व्यक्तीही आपल्या मतानुसार धर्माचा स्वीकार करीत असत. गुप्त राजे सर्व धर्मसहिष्णू असल्याने या काळात कोणत्याही धर्मावर अत्याचार झाल्याची माहिती मिळत नाही. या काळात जैन धर्म प्रगतीशील अवस्थेत होता. कर्नाटकाला केन्द्र बनवून संपूर्ण दक्षिण भारतात दिगंबर संप्रदाय मान्यवर स्थितीत अस्तित्वात होता. गुजराथ, सौराष्ट्र,पश्चिम राजस्थान, माळवा इत्यादी प्रदेशामध्ये श्वेतांबर संप्रदायाचे महत्व होते.उत्तर हिंदुस्थानात मथुरा, हस्तिनापूर, अहिछत्र, कोल उच्चैनगर, कोशांबी, देवगढ, विदिशा, श्रावस्ती, वैशाली, वाराणसी, पाटलीपुत्र, राजगृह, चंपा, पहाडपूर इत्यादी जैन धर्माची प्रमुख केन्द्रे अस्तित्वात होती. पंजाबपासून बंगालपर्यत जैन साधूंचा स्वच्छंदाने विहार चालत होता. श्वेतांबर,दिगंबर या मुख्य संप्रदायाबरोबरच अनेक उपसंघ गण इत्यादिमध्ये विभागलेला जैन समाज म्हणजे एक असामान्य लोकशक्तीच होती व जनमतावर त्यांच्या तत्वज्ञानाचा उत्कृष्ठ प्रभाव होता. गुप्तकालीन उपलब्ध प्रभाव होता. गुप्तकालीन उपलब्ध जैन अवशेषामधील मथुरा येथे मिळालेल्या दगडाच्या जिनमूर्ती, यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती व कित्येक शिलालेख, कहाऊँ (जिल्हा गोरखपूर) येथे पाच जिनेंन्द्राच्या प्रतिमांनी युक्त असलेला लोहमय जिनस्तंभ विदेशाचेजवळ उदयगिरीच्या शिलालेखांनी युक्त असलेले जैन गुहामंदीर, देवगढ येथील प्राचीन जैन मंदीर इत्यादी प्रमुख आहेत. मगधाच्या ज्या लिच्छवी गणाच्या सहायतेने तसेच लिच्छवी राजकुमारी कुमारदेवींच्या विवाह करण्याने चंद्रगुप्त प्रथमचा भाग्योदय झाला व गुप्त साम्राज्याचा पाया रचला गेला. हे प्राचीन व्रात्य क्षत्रियांचे कुल महावीरांच्या वंशातील होते व जैन धर्मानुयायी होते. चंद्रगुप्त दुसरा याच्या दरबारात असलेल्या नवरत्नामध्ये सुप्रसिध्द दिगंबराचार्य सिध्दसेन हेही असावेत असे मानले जाते. उज्जयिनीच्या महाकाल मंदिरात त्यांनी केलेल्या अनेक चमत्कृतीविषयी दंतकथा अस्तित्वात आहेत. स्कंदगुप्ताच्या काळात कहाऊँ येथे जैनस्तंभ उभारण्यात आला. या काळातच बंगालमधील एक जैन मुनींनी मथुरेला येऊन जिनमूर्ती स्थापित केल्याची माहिती मिळते. कुवलयमालाची रचना करणारे उद्योतनसूरी यांचे परंपरागुरु हरिगुप्तसूरी गुप्तवंशातीलच एक राजपुरुष असून, ज्यांनी गुप्तांचा शत्रु हूणनरेश तोरमाणला आपल्या तेजाने पराभूत करुन, आपला भक्त बनविले. या हरिगुप्तचा शिष्य सम्राट देवगुप्त हा सहाव्या शतकातील प्रसिध्द राजा होता. त्याने माळव्यात गुप्तांची सत्ता कायम टिकविली होती. चंद्रगुप्त दुस-याच्या कारकिर्दीत भारताच्या आलेल्या फाहियान याने "प्रजा सर्वांगीण सुखी असून, राजा प्राणदंड किंवा देहदंड देत नव्हता. कोणी जीवहिंसा करीत नव्हते. मद्यपान करीत नव्हते. लसूण कांदाही खात नव्हते. डुक्कर किंवा कोंबडीही कोणीही पाळत नव्हते किंवा जीवित पशूंचीही विक्री जात नव्हती" आपल्या प्रवासवृत्तात असे म्हटले आहे. चिनी प्रवाशाने केलेल्या या वर्णनावरुन समाजातील जैन धर्मप्रभावाची माहिती मिळते. गुप्त काळातील सत्ताधीशांच्या उदार परिश्रमामुळे जैन धर्माचा प्रभाव व प्रसार देशात मोठ्या प्रमाणात झाला. या काळात जैनधर्म समाजात उच्चावस्थेत असून समाजात त्याला आदराचे व मानाचे स्थान होते. तत्कालिन समाजजीवनाच्या प्रमुख अंगामध्ये या धर्माला स्थान होते. सांस्कृतिक, बौध्दिक, वैचारिक, साहित्यिक, कलाविषयक क्षेत्रातही या काळातील जैन धर्माचे योगदान महत्वाचे आहे. श्वेतांबर आगमाचे संकलनही या काळातच वल्लभी येथे झाले. गुप्तकाळाला प्राचीन भारतीय इतिहासकाळातील सुवर्णयुग बनविण्यात या धर्मानेही कार्य केले आहे.

**हर्ष-**

गुप्त साम्राज्याच्या विनाशानंतर उत्तर हिंदुस्थानात निरनिराळ्या सत्ता निर्माण झाल्या. कनोज येथे मौखरी घराणे, सौराष्ट्रात मैत्रक घराणे, भानेश्वर येथे वर्धन घराणे स्थापन झाले. तथापि त्यापैकी वर्धन

घराण्यानेच आपले वर्चस्व कायम टिकविले असे दिसते. पुष्यभूति हा वर्धन घराण्याचा संस्थापक. राज्यवर्धन, हर्षवर्धन व राजश्री ही तीन अपत्ये प्रभाकरवर्धनाला होती. त्यापैकी हर्षवर्धन हा सर्वशक्तिमान व पराक्रमी राजा होय. हर्षानी गौंड वंशातील शशांक राजाचा पराभव केला. सौराष्ट्रातील मैत्रकांचा पराभव केला. गुजराथ व काश्मीरचा काही प्रदेशही त्याने मिळविला. चालुक्य राजा पुलकेशी दुसरा याचेबरोबरही त्याने युध्दे केली. तथापि त्याला पराभव पत्करावा लागला. आपल्या पराक्रमाने त्याने भारतातील शेवटचे साम्राज्य स्थापन केले. याच्या कारकीर्दीतच ह्युएनत्संग नावाचा चिनी प्रवासी भारतात आला होता. त्याने दिलेल्या वर्णनावरुन तत्कालीन जैन समाजाची माहिति मिळते. पंजाबच्या वायव्य सरहद्दीवरील तक्षशिला नगरात तसेच बंगालमधील विहारामधून त्याने जैन निर्ग्रंथ साधू पाहिले होते. राजा हर्ष दर पाच वर्षानी भरणा-या प्रयाग मेळाव्याच्या वेळी इतर देवता बरोबर जिनेंद्राची पूजा करीत असे व इतर साधूप्रमाणेच जैन साधूनांही विपुल ज्ञानदान करी. या काळात मयूरपिच्छ धारण करणारे नग्न साधु अस्तित्वात असल्याची माहिती बाणभट्टाच्या कादंबरीतील उपमांवरुन दिसते. हर्ष स्वत: विव्दान असून विव्दानांचा आश्रयदाता होता. बाणभट्ट त्याच्या दरबारी होताच, तथापि बाणभट्टचा मित्र वीरदेव क्षपणक व भक्तामर स्तोत्रांचा कर्ता मानतुंग आचार्य हेही हर्षाच्या दरबारी असावेत असे दिसते. हर्षानी आपल्या पराक्रमाच्या जोरावर साम्राज्याचा विस्तार केलेला असून सर्वत्र सुख व शांतता स्थापन केली होती. परधर्म सहिष्णुता हे धोरण असल्याने तर निरनिराळे धर्मपंथ राजसभेत परस्पराविषयक मुक्त मनाने चर्चा करीत असत. हर्षाच्या बरोबर या साम्राज्याचाही विनाश झाला व उत्तर हिंदुस्थानात अराजक निर्माण झाले. इ.स. ८ व्या शतकात कनोज येथे यशोवर्धन नावाच्या राजाने आपली सत्ता स्थापण्याचा प्रयत्न केला, तथापि काश्मीरच्या ललितादित्य राजाने याचा पराभव करुन कनोजवर आपली सत्ता स्थापन केली. इ.स. ७६० च्या सुमारास कनोजवर आयुध घराण्याने आपली सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. तथापि काश्मीरचे राजे, पालराजे, व राष्ट्रकूट राजे यांच्याबरोबर आयुध राजांचा टिकाव लागू शकला नाही. त्यामुळे नंतरच्या काळात प्रतिहारांनी राजस्थानात आपली शक्तिसंचय करुन कनोज वर्चस्व प्रस्थापित केले.

**गुर्जर प्रतिहार -**

प्राग्मुसलमान कालीन प्रसिध्द रजपूत वंश हरिश्चंद्र या वंशाचा संस्थापक होता, पण प्रत्यक्षात महान राजा नागभट्ट प्रथम हा या घराण्याच्या सत्तेचा खरा संस्थापक होय. सिंधच्या अरबांचा त्याने पराभव केला. नांदीपुरचे गुर्जर, जोधपूरचे प्रतिहार, भडोचचे चाहमान इत्यादी छोटी राज्ये त्याच्या ताब्यात होती. यानंतर कक्कुक व देवराज हे राजे झाले. कक्कुक जैनधर्मी होता व त्याने एक विशाल जैन मंदीर बांधले होते. त्यानंतर देवराजचा पुत्र वत्सराज रणहस्ति गादीवर बसला. जैनाचार्य उद्योतन सूरीने आपल्या कुबलयमाला मध्ये या राजाचा भारतवर्षातील तत्कालीन सर्वश्रेष्ठ राजा म्हणून उल्लेख केला आहे. त्याची मुख्य राजधानी भिन्नमाल असून मालवा, मध्यभारत व गुजराथमधील मोठा प्रदेश यांच्या ताब्यात होता. पालराजे, राष्ट्रकूट राजे यांच्याबरोबर सदैव संघर्ष त्यानी कनोजवर आपली सत्ता कायम टिकविली व कनोज राजधानी बसविली वत्सराजाला जैन साहित्यात जैन धर्माचा एक मोठा समर्थक व सहाय्यक म्हणून चित्रित केले आहे. ओसिया, श्रीमाल इत्यादी नगरात त्याने विशाल जिनमंदीराची स्थापना केल्याची माहिती मिळते. या राजाच्या राज्यातच जिनसेनानी आपले प्रसिध्द हरिवंशपुराण वर्धमानपुर येथे रचिले. या राजाने कनोज, मथुरा, अनलिवाड, मोघरा इत्यादी ठिकाणी अनेक जैन मंदिरे बांधली. कनोजचे मंदीर १०० फूट उंचीचे असून त्यातील भ. महावीरांची मूर्ती सुवर्णाची होती. ग्वाल्हेरमध्ये या राजानी २३ हाथ उंचीची तीर्थकराची मूर्ती स्थापन केली होती.

वत्सराजाचा पुत्र नागभट्ट व्दितीय आपल्या पित्याप्रमाणेच पराक्रमी व विजयी होता. पाल व राष्ट्रकूटाबरोबर संघर्ष करुन ८१६ मध्ये त्याने कनोजवर पुन्हा आपले वर्चस्व प्रस्थापित केले. जैनधर्माचा हा प्रश्रयदाता होता. जैनाचार्य बप्पभट्टसूरीचा तो मोठा आदर करीत होता. मथुरेच्या प्राचीन जैनस्तूपाचा

जीर्णोध्दार याच्याच आश्रयाने झाला. यानंतर रामदेव व त्याचा पुत्र भोज हे राजे झाले. राष्ट्रकूट, पाल राजाबरोबर त्याचा संघर्ष झाला. भारतावर आक्रमण करणा-या अरबांचा हा प्रमुख शत्रु होता. हा राजा उदार व सहिष्णू असून जैनधर्माचा आश्रयदाता होता. याच्या काळात देव संघाचे आचार्य कमलदेवांनी देवगढ किल्ल्यात शांतिनाथ तीर्थंकरांच्या मंदिरासमोर मानस्तंभ प्रतिष्ठापित केला. देवगढ, खजुराहो येथील सुंदर जैनमंदिरे याच काळात तयार झाली. या काळातील अनेक ताम्रपट व शिलालेख मिळतात. भोजचा पुत्र महेंद्रपाल प्रथम हा पराक्रमी राजा होता, तथापि यानंतरच्या भोज व्दितीय व महिपाल यांच्या काळात राष्ट्रकूटांनी यांचा पराभव केला. त्यानंतरचा राजा महेंद्रपाल दुसरा विद्याप्रेमी असून, सोमदेव सूरीनी या काळासाठी आपला नीतिवाक्यामृत ग्रंथ लिहीला. यानंतर देवपाल, विनायकपाल, राज्यपाल, यशपाल इत्यादि राजे झाले. यशपालाच्या काळात १०२३ मध्ये मथुरेला एक जैन मंदिर बांधण्यात आले. यानंतरच्या काळात खजुराहोचे चंदेले, ग्वालियरचे कच्छपहट, धारचे परमार, मध्यभारतातीलकलचुरी इत्यादी स्वतंत्र झाले व गुर्जर प्रतिहारांचे साम्राज्य छिन्नविछिन्न झाले. या घराण्यातील राजांनी प्रत्यक्षात ३०० वर्षापर्यंत भारतातील मुसलमान सत्तेच्या प्रसाराला पायबंद घातला. प्रतिहाराबरोबरच उत्तर हिंदुस्थानातील कनोजचे राजधानीचे वैभव नष्ट झाले.

**लहान हिंदू राजे-**

गुर्जर प्रतिहाराबरोबरच दक्षिणेतील राष्ट्रकूट व बंगालच्या पाल राजसत्तेचेही पतन झाले. काश्मीरचा नागकर्कोटक वंश समाप्त होऊन त्या जागी उत्पल वंशाची स्थापना झाली होती. भारताच्या पश्चिमोत्तर सीमेवर तुर्की मुसलमानांचे आक्रमण सुरु झाले होते. या काळात संपूर्ण भारतात लहान लहान राज्यांची स्थापना झाली. कोणतेही एक साम्राज्य या काळात नव्हते. या काळात अनेक राजपूत राजवंश निर्माण झाले म्हणूनच या युगाला राजपूत युग म्हणतात. त्यापैकी कनोजचे गहडवाल, सांभारचे चाहमान, दिल्लीचे तोमर, पंजाबचे साही, धारचे परमार, मेवाडचे गहिलोत, हस्तिकुंडीचे राठोड, श्रावस्तीचे ध्वजवंशी, देवगढ, खजुराहो येथील चंदेल, ग्वाल्हेरचे कच्छपघट ही महत्वाची घराणी होत.

शाकंभरीच्या चाहमान घराण्यातील पृथ्वीराज प्रथम व व्दितीय जैनधर्माचे परमभक्त होते. पृथ्वीराज प्रथमने रणभंभोरच्या जैन मंदिराच्या शिखारावर स्वर्णकलश चढविली, पृथ्वीराज व्दितीयने जैन मंदिरासाठी मोरकुटी गाव दान दिले. १२ व्या शतकातील विग्रहराज चतुर्थचा भाऊ सोमेश्वर जैन धर्माचा उपासक होता. पार्श्वनाथाच्या मंदिरासाठी त्याने रेणुका नावाचे गाव भेट दिले. अजमेर, नाडौल, दिल्ली येथील तत्कालीन चाहमान राजे जैन धर्माचे उपासक किंवा आश्रयदाते होते. नाडौलच्या अश्वराजाने आपल्या राज्यात पशुहत्येला प्रतिबंध केला तर त्याचा पुत्र अन्हळदेवाने विशाल जिनमंदीर बांधले व श्रावकांच्या व्यवस्थेसाटी दान दिले. १२२९ च्या ताम्रपटात या दानाची माहिती मिळते.या राजाची शेवटी राज्य त्याग करुन तो जैन साधु झाला. त्याचे वंशजही जैन होते.

धारच्या परमार घराण्यातील सीयक राजाने सन ९५४ मध्ये आपला पुत्र मुञ्ज याला राज्य देऊन आपण जैनाचार्याच्याकडून मुनिदीक्षा घेतली व उर्वरित आयुष्य जैन तपस्याप्रमाणे व्यतीत केले. मुञ्जच्या संबंधीही प्रबंधचिंतामणी वगैरे ग्रंथात अनेक कथा आहेत. जैनकवि धनपाल व जैनाचार्य महासेन व अमितगति यांना त्याने आश्रय दिला होता. या घराण्यातील भोज राजाही जैन धर्माचा प्रबळ पोषक असून, त्यावेळी धारानगरही दिगंबर जैनांचे प्रमुख केंद्र बनले होते. राजा जैन विव्दान व मुनींचा आदर करणारा होता. त्याने जैन मंदिरेही बांधली असावीत. अमितगति, माणिक्यनंदी, नयनंदी, प्रभाचंद्र इत्यादींना राजाचा आश्रय होता. यशोवर्सदेव राजाही जैनधर्म व जैन गुरुंचा आदर ठेवणारा राजा होता. जिनचंद्र नावाच्या एका जैन व्यक्तीला

त्याने गुजराथ प्रांताचा प्रशासक म्हणून नेमले होते. यांच्या राज्यातील माळवा, उज्जैन, धार, मांडू इत्यादी जैन धर्माची प्रमुख व प्रसिध्द शहरे होती.

८ व्या शतकातील मेवाडचा राजा धवलप्पदेवाचे कनिष्ठ पुत्र बहुधा वीरप्पदेव होता. तो पुढे प्रसिध्द जैनाचार्य वीरसेन नावाने प्रसिध्द झाला व ज्यांनी दिगंबर आगमांची विशालकाय टीकांची रचना करुन त्यांना 'धवल' नाव दिले.

ते वीरसेन स्वामीचे विद्यागुरु होते. राष्ट्रकूटांनी पराभव केल्यानंतर ते वाटनगर येथे आले व तेथे आपले विद्यापिठ स्थापन करुन त्यांनी धवलादी महान ग्रंथाची रचना केली. दहाव्या शतकातील शक्तिकुमार राजाच्या काळात चितोडच्या जैन किर्तीस्तंभ बनविण्यात आला. पंधराव्या शतकात दिगंबर जैन सेठ साहजीजानी याचा जीर्णोध्दार केला. या काळातील अनेक राज्य कर्मचारीही जैन होते. गौरीशंकर ओझाच्या मतानुसार सूर्यास्तानंतर भोजन करण्यास या काळात मनाई होती. प्रसिध्द तीर्थ व ऋषभदेव तीर्थंकरांची पूजा जैन अजैनही करीत असत. अनेक जैनमंदिरे स्वतः राजानी बांधली व कित्येकाला दान दिले.

हस्तिकुंडीचे राठोड राजे जैन धर्मीय होते. विदग्वराज (९१६) परमभक्त जैन होता. राजधानीच्या ठिकाणी त्याने ऋषभदेव तीर्थंकारांचे विशाल मंदीर बनविले व त्या मंदिराला भूमि प्रदान केली. त्याचे वंशज मम्मट, धवल हे जैन धर्माचे उपासक व दाते होते. जैन धर्माच्या प्रभावनेसाठी या राजांनी अनेक कार्ये केली. आपल्या ४०० वर्षाच्या दीर्घकाळात चंदेल राजांनी भारतातील कलेचे अभूतपूर्व पोषण केले. त्यांचा जैनधर्म नसतानाही जैनधर्माच्या बाबतीत त्यांनी सहिष्णु धोरण स्वीकारले. देवगढ, खजुराहो, महोबा, अजयगढ, छंदपुर, छत्तरपुर, टीकमगढ इत्यादी चंदेलांच्या प्रमुख देशात जैनांच्या समृध्द वस्त्या होत्या. श्रीदेव, वासवचंद्र, कुमुदचंद्र इत्यादि अनेक निर्ग्रंथ दिगंबर साधूंना-विव्दानाना राज्यात मुक्त प्रदेश व आदराची वागणूक होती. अनेक जैन मंदिराची व कलाकृतींची निर्मिती या काळात झाली. या काळातील जैन कलेचे नमुने भारतीय कलेतील सर्वश्रेष्ठ नमुने आहेत व मध्यकालीन भारतीय कलेचे ते प्रातिनिधीक आहेत. या राज्यातील जैनांनीही राज्याच्या सर्वांगीण प्रगतिसाठी प्रयत्न केल्याची माहिती मिळते.

१२ व्या शतकातील ग्वाल्हेरच्या कच्छपहट राजानीही जैनधर्माला उदार आश्रय दिला. तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ या वंशाचे इष्टदेव होते.

उपर्युक्त राजवंशाशिवाय या काळात जैनांचे अनेक लहान लहान राजे होते व त्यांनी जैनधर्माला आश्रय दिलेला दिसतो. त्यामुळे या राज्यातून जैनधर्माचे उपासक सुखासमाधानात रहात होते. या काळात सूर्य, शक्ति, विष्णूला मानणारे, वीरशैव, लिंगायत, तांत्रिक इत्यादी अनेक नवीन संप्रदाय निर्माण झाले व या सर्वांना एकत्रित हिंदु धर्म म्हणण्यात येऊ लागले. मध्यकाळात राजनैतिक व सामाजिक दृष्टीने हिंदु व जैन धर्मात फारसा फरक दिसेनासा झाला. अनेक हिंदु व मुसलमान सम्राट जैन धर्माचे आश्रयदाते होते. राजपूत, ठाकूर, ब्राह्मण इत्यादींपैकी कित्येक जण जैन धर्माचे उपासक होते. इंपेरियल गॅझेटियर नुसार १०००-१२०० मध्ये जैनधर्म मध्य भारतातील उच्च वर्णातच होता. तथापि हलकेहलके तो व्यापार करणा-या वाणिज्य वर्गातही पसरु लागला. अनेक संप्रदाय, प्रादेशिक भेद, संघ, गण, कच्छ इत्यादीमध्ये जैन धर्माचे विभाजन झ ाले तरी जैनधर्मीय संस्कृती व मौलिकता पूर्वीप्रमाणेच अक्षय राहिली. बाह्य आचार-विचार, पूजापध्दती, उत्सव इत्यादीवर हिंदु आदान-प्रदानाचा काही परिणाम झाला असला तरी, मौलिक विश्वास व परंपरा कायम टिकल्याने भारतातील एक प्रमुख, स्वतंत्र धर्माचे त्याचे स्थान कायम राहिले. भारतीय सहिष्णुतेमुळेच निरनिराळे धर्म स्वतंत्रपणे प्रगतिशील राहू शकले. त्यामुळे पुढील काळात विदेशी मुसलमान आले तरी जैन धर्माची अवस्था हिंदु धर्माप्रमाणेच राहिली. शांतता प्रिय व्यापा-यामध्ये हा धर्म पसरलेला असल्याने मुसलमान सत्ताधिशाकडूनही या धर्मावर फारसे अत्याचार झाले नाहीत.

**मध्ययुग-मुघल पूर्व काळ**

१३ व्या शतकापासून ते १८व्या शतकापर्यंतचा ५०० वर्षाचा कालखंड मध्ययुगीन काळ म्हणून ओळखला जातो. मध्य आशियाई मुसलमानी उत्तर-पश्चिमी सीमा पार करुन भारतीय प्रदेशावर केलेले आक्रमण भारतात त्यांच्या राजकीय सत्तेचा प्रारंभ विकास, स्वदेशीय सत्तांचा हलके हलके विनाश ह्या या काळातील सर्वात महत्वाच्या घटना होत.

इ.स. ६व्या शतकात अरब राष्ट्र सर्व मुसलमान राष्ट्रात मागासलेले होते. तेथील लोक बलिष्ठ, परिश्रमी, युध्दप्रेमी होते, तथापि आर्थिक दृष्ट्या मागासलेले होते. अनेक गटात विभाजित झाल्याने परस्पर युध्दातच त्यांचा काल व्यय होत होता. यावेळी इ.स. ५७० मध्ये मक्का येथे मुहम्मदचा जन्म झाला. तरूण वयात आपल्या जातीची स्थिती पाहून तो दुःखी झाला. ही स्थिती सुधारण्यासाठी प्रचलित आचार-विचारातील चांगली तत्वे निवडून व आपल्या बुध्दीने त्यांना योग्य प्रकारे परिवर्तित करुन आपल्या बांधवांना सरळ समजण्याजोग्या संक्षिप्त नवीन धर्माचा त्याने प्रसार केला. मुहम्मदानी राजनैतिक, सामाजिक व धार्मिक या तीनही सत्ताना एकत्र करुन आपल्या धर्म-राज्याची स्थापना केली. तो स्वतः नेता बनला व आपल्या अनुयायांना एका हातात कुराण व दुस-या हातात तलवार घेऊन धर्म प्रचारार्थ निघण्याची आज्ञा दिली. या मार्गात विवेक किंवा तर्काला संधी न देता पैगंबराच्या आज्ञेला त्यानी प्रमाण मानले. मुहम्मदाच्या मृत्यूनंतर इस्लाम धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार होऊ लागला. अरबांना नवीन जीवन व उत्साह मिळाला. ६४४ मध्ये मकरान व बलुचिस्तानच्या मार्गानी अरबांनी भारताच्या सिंधु प्रदेशावर प्रथम आक्रमण केले. तत्कालीन हिंदु राजा सिंहराराम युध्दात मारला गेला. ७१२ मध्ये मुहम्मद बिन कासिमने प्रबळ आक्रमण केले. सिधचा राजा दाहीर या युध्दात मारला गेला व सिंधवर अरबांना विजय मिळाला. अरबांच्या रुपाने मुसलमानानी या देशात सत्ता मिळविण्यास सुरुवात केली. अरबांनी गुजराथ वगैरे आसपासच्या प्रदेशात राज्यविस्ताराने केलेले सर्व प्रयत्न असफल झाले.

१०व्या शतकाच्या प्रारंभी अफगाणिस्थानच्या गजनी नगरात गजनी वंशाचा उदय झाला. गजनीचा अमीर सुबुक्तगीन याने भारतीय प्रदेशावर ९८७, ९८९ मध्ये आक्रमण केले, तथापि तो पराभूत झाला.

पान नं ९७

सैयदवंश (१४१४-१४५०) दिल्लीच्या आसपासच्या प्रदेशावर या घराण्याचे राज्य असून या घराण्यात तीन राजांनी राज्य केले, तथापि या घराण्याची सत्ता मोठी नव्हती. सैयद मुबारकशाहचा हेमराज नावाचा एक जैन मंत्री होता.

लोदी ( १४५०-१५२६) सैयदांचा काळात पंजाबचा सुभेदार असलेल्या लोदीनी १४५० मध्ये दिल्लीवर आपली सत्ता स्थापून स्वतःला सुलतान म्हणून घोषित केले. पंजाब ते बनारस व हिमालय ते बुंदेलखंड या प्रदेशावर त्यानी आपली सत्ता प्रस्थापित केली. प्रहलोलनंतर त्याचा पुत्र निजामखाँ सुलतान सिकंदर गाजी, सुलतान झाला. याला सिध्दांतशास्त्रात आवड असून, महान प्रसिध्द जैनाचार्य विशालकीर्ति सिकंदराच्या दरबारात आला होता, तेथील वादविवादात त्याने विजय मिळविला. सिकंदरानी त्याचा सन्मान केला. त्यानंतर इब्राहीम लोदी (१५१७-१५२६) गादीवर आला. बाबराने पानिपतच्या युध्दात याचा पराभव करुन दिल्लीवर मोगलांची सत्ता स्थापन केली.

मुहम्मद तुगलघच्यावेळी साम्राज्याचे अनेक लहान लहान विभाग स्वतंत्र झाले होते व ठिकठिकाणी मुसलमान सत्ता स्थापन झाल्या. त्यापैकी बंगाल, जोमपुर, गुजरात, माळवा, काश्मीर व दक्षिणेतील बहामनी सत्ता महत्वाच्या होत.

१३४० मध्ये फखरुद्दीनने बंगालमध्ये सत्ता स्थापन केली. या राज्यात सिकंदरशह, हुसेनशाह राजे झ ाले. या सुलतानांनी राज्यरक्षणाबरोबरच प्रजापालन, साहित्य अभिरुची, बंगाली भाषेचा विकास व परधर्मसहिष्णुता इत्यादी बाबतीतही काटेकोर धोरण स्वीकारले होते.

१४०१ मध्ये शहाबुद्दीन घोरीनी माळव्यावर आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. होशंगशाह, मुहम्मद, महम्मुद खिलजी, गयासुद्दीन, नासिरुद्दीन महम्मद द्वितीय इत्यादी राजे या घराण्यात होउुन गेले. १४२४ मध्ये दिल्लीचे मूलसंघी भट्टारक शुभचंद्राच्या उपदेशामुळेच होशंग घोरीच्या राज्यात संघपति होलीचंद्र व अनेक धनी श्रावकांनी देवगढ येथे तीर्थकरांच्या मूर्ती निर्माण करुन मोठा प्रतिष्ठोत्सव केला होता. अनेक जैन सुलतानाच्या पदरी होते. संघपती झम्पण राज्यमंत्री होता. बाहड शियाबुद्दीनचा मंत्री होता. बाहडचा पुत्र मंडन होशंग घोरीचा प्रधानमंत्री असून काव्यमंडन, शृंगारमंडन, संगीतमंडन, सारस्वतमंडन इत्यादि विविध ग्रंथाची त्याने निर्मिती केली. मंडनचा चुलत बंधु धनंदराजाने याच काळात शतकत्रयाची रचना केली. गयासुद्दीनच्या काळात श्रुतकीर्तीच्या हरिवंशपुराणची एक प्रतिलिपी जोहट शहरात तयार करण्यात आली. या सुलतानाच्या काळात माळव्यत जैनांची अवस्था उत्तम होती. मांडू व अन्य ठिकाणी या काळात अनेक जैन मंदिरे होती.

१३१९ मध्ये जाफरखाँने आपला पुत्र तातारखाँला सुलतान नासिरुद्दीन मुहम्मदशाह या नावाने गुजरातवर बादशहा म्हणून प्रस्थापित केले. यानंतर मुजफ्फरशाह, अहमदशाह, महमूद बेगडा, बहादुरशह इत्यादी राजे झाले. या सुलतानांनी अहमदाबादला त्या काळातील सुंदर नगरी बनविले. तेथील कलाकृतीवर हिंदू व जैन कलेचा प्रभाव होता. या काळात जैनांचे देलवाडा, गिरनार, आबू, अनहिलवाड, अहमदाबाद येथील मंदिरे सुरक्षित होती. दिगंबर आम्नायाच्या लाटबागड संघाचाही येथे चांगला प्रभाव होता. १५ व्या शतकापर्यंत सुरत, सौजित्रा, भडोच, ईडर येथे दिगंबर भट्टारकांचा प्रभाव स्थापन झाला होता. आचार्य सकलकीर्ति, ब्रह्मश्रुतसागर, नेमिस्त, ज्ञानभूषण, शुभचंद्र इत्यादि विद्वानांनी विविध विषयावर विपुल साहित्य निर्मिती केली होती. याशिवाय जिनेश्वर व भद्रेश्वरच्या 'कथावालीयाँ', प्रभाचंद्रचे प्रभावक चरित्र, मेरुतुंगचा प्रबंध चिंतामणी, राजशेखरचा प्रबंध कोष इत्यादि ऐतिहासिक ग्रंथ या काळातच झाले.

१४ व्या शतकाच्या प्रारंभी शाह मिर्झानी काश्मीरवर आपली स्वतंत्र सत्ता स्थापन केली. या घराण्यात सिकंदर, जैतुलआदबवीन इत्यादि राजे झाले. जैतुलआदबवीन स्वतः मांस खात नसून, एक पत्नी व सदाचारी होता. संस्कृत व अरबी ग्रंथाचे त्यानी भाषांतर करविले व साहित्य संगीत कलेला प्रोत्साहन दिले.

हसन नावाचा एक तुर्की शिपाई दौलताबादच्या गंगू नावाच्या ब्राह्मणाचा सेवक होता, ज्या ब्राह्मणाच्या कृपेमुळे हसनचा उत्कर्ष झाला. जफरखाँ या नावाने त्यानी शक्तिसंचय करण्याला सुरुवात केली व १३४७ मध्ये दौलताबादवर त्याने स्वतंत्र सत्ता स्थापन केली. या घराण्यात मुहम्मदशाह प्रथम, सुलतान फिरोज, अहमदशाह, अल्लाउद्दीन द्वितीय, हुमायू, मुहम्मदशाह तृतीय, महमूदशाह इत्यादि राजे झाले; शेवटी बहामनी साम्राज्याचे इमादशाही, बरीदशाही, कुतुबशाही, निजामशाही, आदीलशाही या पाच शाह्यात विभाजन झाले.

लहान लहान मुसलमान सत्ताप्रमाणेच या काळात कांही शक्तिशाली हिंदु राज्येही निर्माण झाली, त्यात दक्षिणेतील विजयनगरचे साम्राज्य व मेवाडच्या रजपुतांची, ग्वाल्हेरच्या तोमरांची सत्ता होय.

**मेवाडचे राजपुत-**

पूर्व मोगल काळातील मेवाडच्या राजानी भारतीय स्वातंत्र संघर्ष जीवंत ठेवला. राजपुतान्यातील सर्व हिंदूना एकत्र आणून सुलताशी संघर्ष केला. या राज्यात शैव व वैष्णव धर्म प्रधान असला तरी, जैन धर्माच्या बाबतीत राजांचे धोरण सहिष्णु होते. दिगंबर व श्वेतांबर साधूंचा राजस्थानात सर्वत्र विहार होता. अनेक ठिकाणी तीर्थे, सांस्कृतिक केंद्रे होती. राजे, मांडलिक, राजपत्नी कित्येकदा जैन धर्मानुयायी होत्या. त्यामुळे येथील जैनांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. जैनांनी मेवाड राज्याच्या संरक्षण, शासनप्रबंध, धर्म, साहित्य, कला, सांस्कृतिक विकास इत्यादि क्षेत्रात योगदान केले. मेवाड राज्यात प्रत्येक किल्ल्यात एक जैनमंदिर

बांधण्याची प्रथा होती. रात्र-भोजनाच्या विरुध्द राजाज्ञा होती. कोणी जैन साधु राजधानीत आल्यास महाराणी राजमहालात त्यांचे आदरपूर्वक स्वागत करी व आहार देत. राज्यसभेत, चर्चेत, वादविवादात जैन साधु भाग घेत. जैन तीर्थांना राजे संरक्षण देत. १४९१ मध्ये राजस्थानातील शाह जीवराज पायडीवाल यांनी धातु व पाषाणाच्या असंख्य जिन मूर्ती तयार करवून ठिकठिकाणी त्यांची प्रतिष्ठापना केली. या काळात जैनधर्मीय समाज प्रगतिशील अवस्थेत होता.

**ग्वाल्हेरचे तोमर-**

१३९८ मध्ये तैमूरलंगचया आक्रमणाचा फायदा घेवुन वीरसिंह तोरमाणनी ग्वाल्हेरच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली. गणपति देव, डूंगरसिंह, करणसिंह, मानसिंह इत्यादि राजानी या घराण्यात राज्य केले. तोमर धार्मिक, उदार सहिष्णु, संस्कृति प्रेमिक होते. ग्वाल्हेर किल्ल्याच्या आतील दरवाजावर विशाल जैन मूर्ती कोरलेल्या आहेत. हे कार्य ३३ वर्षे चालले. अनेक जिनमंदिरांचा जीर्णोध्दार करण्यात आला, नवीन बांधण्यात आली, वीरसिंहाने चंद्रप्रभु चैत्यालय बांधले. यशकीर्ति हे या काळातील मोठे विद्वान व ग्रंथकार होते. त्यांनी १४२९ मध्ये श्रीधरकृत संस्कृत भविष्यदत्तचरित्र व अपभ्रंश सुकुमाल चरिताची प्रतिलिपी तयार केली. पांडव पुराण व १४४३ मध्ये हरिवंश पुराणाची रचना केली. जिनरात्रि कथा, रविव्रत कथा व चंद्रप्रभचरित्र या अन्य रचना होत. यांचे सर्व ग्रंथ अपभ्रंश भाषेत आहेत. ग्वाल्हेरच्या नगरशेठ पद्मसिंहानी १४६४ मध्ये २४ जिनमंदिरे बांधली. ब्रह्मचारी खेल्हानी याच काळात ग्वाल्हेरमध्ये चंद्रप्रभूंची विशाल मृत्तिका-मूर्ती निर्माण केली व कमलसिंहान ११ हात उंच आदिनाथाची प्रतिमा तयार केली. मलयकीर्ति व गुणभद्रानीही अनेक ग्रंथाचे लेखन केले.

आग्रा नगराच्या पूर्व दक्षिण व ग्वाल्हेरच्या उत्तरेला यमुना व चंबळच्या मध्यवर्ती प्रदेशावर एक लहान हिंदु राज्य होते. खेडा ही राजधानी असून हे राजे जैन धर्मानुयायी होते. ९-१० व्या शतकात असाईखेडा येथे तयार असलेल्या जैन मंदिराचे अवशेष आढळतात. हे नष्ट झाल्यानंतर शेजारील चंदवाड येथे चंद्रपाल नावाच्या चौहान राजपुताने आपले राज्य स्थापिले. या राज्यात जैनधर्म व जैनांना मान्यता, प्रतिष्ठा होती. येथील राजे, प्रधानमंत्री जैनधर्मीय असून त्यांनी अनेक जैन मंदिरे बांधली व जिनालयांचा जीर्णोध्दार केला. शौरीपुर तीर्थाच्या यात्रेसाठी चंदवाडला आलेल्या गुजरातच्या धनपाल कवीने अपभ्रंश भाषेतील बाहुबली चरित्र लिहिलेञ दिल्लीच्या पट्टाचार्य पद्मनंदीनेही वासाधरच्या प्रेरणेवरुन 'श्रावकाचार सारोद्दार' रचले. १२ व्या शतकापर्यंत हे राज्य अस्तित्वात होते.

११९० ते १३४० या अडीचशे वर्षात मुसलमानी राजनैतिक प्रभुत्वाची द्रुत गतीने वाढ झाली. त्यांनी अटक ते कटक व हिमालय ते कन्याकुमारीपर्यंतचा प्रदेश आपल्या ताब्यात आणला. हे नवागत मुसलमान विदेशी होते. धन, राज्यलोभ व इस्लामचा प्रचार या भावना उन्मत होत्या. त्यांचे रोमांचकारी अत्याचार व अमानुषिक क्रूरता भारतीयांना नवीन होती. त्यामुळे एकत्र येवुन विरोध करण्याची भारतीयांना संधीच मिळाली नाही. त्यामुळे अवघ्या १५० वर्षात इस्लामांचे बळ वाढत गेले. विजयनगर, माळवा, मेवाड, ग्वाल्हेर, चंदवाड इत्यादी ठिकाणी हिंदूनी एकत्र येवुन त्या आक्रमणाला तोंड देण्याचा प्रयत्न केला, तथापि राजधानी, किल्ले, सैन्य इत्यादीवर आपली नियंत्रित सत्ता, असली तरीही सामान्य नागरिक शासन पूर्ववत भारतीयांच्या ताब्यातच राहते हे जाणविल्यानंतर त्यांनी हिंदु जैनचित्र, मूर्ती इत्यादी कलेत रसिकता घेण्याला सुरुवात केली. भारतीयांना अधिकार दिले. प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन दिले. अनेक विचारांच्या, धर्माच्या विद्वानांना राजाश्रय दिला. सुरुवातीला हिंदु व जैन कवीनी उत्साहवर्धक वीरगाथा व धार्मिक ऐतिहासिक कथांच्या आधारे वीरांचे स्वातंत्र्य प्रेम जागृत करण्याचा प्रयत्न केला. तथापि नंतरच्या कवींनी सुफी संतांच्या प्राज्ञ मार्गाचा प्रसार सुरु केला. दोन्ही धर्मात सुधारणा व परिवर्तनाच्या सहाय्याने विरोध दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. हिंदू जैन यांनी काळानुसार आपल्या धर्मसंस्थात बदल घडवून आणले. देशाच्या कला, धर्म व संस्कृतीच्या क्षेत्रात अभिवृध्दि घडवून आणण्याचा त्यांनी प्रयत्न केल.